Unit 2

# गांधी युग

## प्रास्ताविक :-

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील १९२० ते १९४७ या कालखंडातील गांधी युग असे म्हणतात. या कालखंडात महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशाने परकिय ब्रिटिश राजवटीविरुद्ध यशस्वीपणे लढा दिला. संपुर्ण देशाच्या राजकारणाचा केंद्रबिंदू महात्मा गांधी होते. जगात साम्राज्य आणि वर्चस्व असणाऱ्या शक्तिशाली इंग्रज सत्तेला शेवटी माघार घ्यावी लागली आणि देश स्वातंत्र्य झाला. गांधीजींनी तो लढा हाती शस्त्र न घेता अहिंसेच्या मार्गाने लढविला हे जगातील पहिले यशस्वी आदर्श उदाहरण होय. त्यांनी जगाला एक विचार दिला त्याला गांधीवाद म्हणतात.

## महात्मा गांधीजींचे पुर्वचरित्र :-

२ ऑक्टोबर १८६९ रोजी पोरबंदर येथे जन्मलेल्या गांधीजींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. त्यांचे वडील राजकोट संस्थानचे दिवाण होते. विद्यार्थीदशेत वयाच्या केवळ १२ व्या वर्षी कस्तुरबाशी त्यांचे लग्न झाले. पदवी शिक्षण मुंबईला झाल्यावर १८८८ ते १८९१ या काळात इंग्लंडला वकीलीचे शिक्षण पूर्ण केले. भारतात परतले आणि वकीली करु लागले. या काळात त्यांची रामचंद्र रावजीभाई यांचेशी मैत्री झाली. त्यांचा प्रभाव पडला. १८९३ साली वकिली व्यवसायासाठी आफ्रिकेला गेले. तेथे गोऱ्या युरोपिय राज्यकर्त्यांकडून वांशिक भेदभावातुन त्यांना आलेल्या अत्यंत वाईट अनुभवातुन त्यांचे सगळे आयुष्यच बदलून गेले आणि यातुनच सुरुवात ~~झाला~~ गांधीवादाची सुरुवात झाली.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

# महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान :-

गांधीजींचे जीवन हेच एक तत्वज्ञान आहे ते जसे बोलतात तसेच वागतात त्यात कधीच विसंगती नव्हती सहिष्णुता विनम्रपणा त्याचबरोबर कणखरपणा तसेच आशिर्वाद दीनदुबळ्यांबद्दल अपार सहानुभूती व्यक्ती नव्हे तर वृत्तिला विरोध असे अनेक असामान्य गुण त्यांच्याकडे होते त्या गुणांची आयुष्यभर अत्यंत प्रामाणिकपणे अनेक त्यांनी उपासना केली कोणत्याही एका धर्माचा त्यांच्यावर प्रभाव नव्हता विविध धर्मांचे तत्वज्ञान त्यांनी अभ्यासले आणि सर्वांतुन चांगले विचार तत्वज्ञान स्वीकारले त्यांचे राजकीय तत्वज्ञान सत्य अहिंसा सत्याग्रह या वैशिष्ट्यांतुन स्पष्ट करता येईल

1) सत्य :-

सत्य म्हणजे खरेपणा हे गांधीजींनी साध्य मानले त्या ध्येयापासुन ते कधी ढळले नाहीत सत्य म्हणजे आयुष्यातील आदर्श संकल्पना होय जेथे सत्य तथेच परमेश्वर असे ते मानत यातुन सामाजिक नीति-मुल्ये विकसित होत असतात.

2) अहिंसा :-

सत्य हे साध्य तर अहिंसा हे साधन होय दोन्ही गोष्टी एकदुसऱ्यास पुरक आहेत अहिंसा या तत्वज्ञानाचे स्पष्टीकरण त्यांनी १९२० साली यंग इंडिया या साप्ताहिकात केले आहे त्यानुसार अहिंसा म्हणजे भित्रेपणा आजिबात नव्हे कोणाही प्राणीमात्राला विचार आचार किंवा उच्चाराने न दुखवणे म्हणजे अहिंसा होय अहिंसेच्या मार्गानेच सत्याकडे जाता येते.

3) सत्याग्रह :-

गांधीजींनी आपल्या राजकीय चळवळीत सत्याग्रहाला फार मोठे महत्व दिले त्यांचे स्वातंत्र्य आंदोलन सत्याग्रह

Scanned by CamScanner

फार मोठे महत्व दिले यांचे स्वातंत्र्य आंदोलन सत्याग्रहाच्या मार्गाने यशस्वी झाले. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी आग्रह करणे होय सत्य आणि अहिंसा यांचा समन्वय म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रह म्हणजे प्रत्यक्ष कृती होय सत्याग्रह करणारा तो सत्याग्रही होय तो शांत असतो चुकीच्या गोष्टीपुढे तो नमत नाही त्यासाठी त्याने भय द्वेष आणि असत्य याचा त्याग केला पाहिजे गांधीजींनी सत्याग्रहाचे मार्ग खालीलप्रमाणे सांगितले

अ) असहकार ब) सविनय कायदेभंग क) स्वदेशी ड) हरताळ इ) बहिष्कार हे मार्ग म्हणजे स्वातंत्र्यपणे व प्रामाणिकरित्या राबवलेल्या चळवळी होत्या यातुन स्वातंत्र्य चळवळीला बळ मिळत गेले आणि स्वातंत्र्य मिळाले या पाचही चळवळी म्हणजे सत्याग्रह होय त्यापैकी अ) असहकार ब) सविनय कायदेभंग यांचा यानंतर लगेचच आपण स्वतंत्र अभ्यास करणार आहोत उरलेल्या तीन चळवळी

क) स्वदेशी :-

आधुनिक भारताच्या इतिहासात गांधीजींच्या या चळवळीला मोठे महत्व आहे. ही चळवळ जशी राजकीय तशीच सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाची होती तत्पूर्वी लोकमान्य टिळकांच्या चतुसुत्रीमध्ये स्वदेशी व बहिष्कार हे कार्यक्रम होते पण गांधीजींनी त्याचा लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी उपयोग केला यातुन भारतीयांना रोजगार मिळाला व स्वस्त दराने वस्तु मिळु लागल्या लोक देशाप्रेमाने भरावले आणि स्वातंत्र्य चळवळीत सामील झाले देशभर खादी ग्रामउद्योग सुरु झाले लोक स्वदेशी वस्तुंचा आग्रह धरु लागले त्यातुन ब्रिटिशांनी चालविलेल्या आर्थिक शोषणाला आळा बसला.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

३) हरताळ :-

हरताळ पाळणे म्हणजे कामकाजावर बहिष्कार घालुन काम व त्याचबरोबर उत्पादन बंद पाडणे होय आपणावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी गांधीजींनी कामगार विद्यार्थी शिक्षक व्यापारी अशा सर्व क्षेत्रांतील लोकांना हा मार्ग सांगितला हारताळ म्हणजे हिंसा करणे नव्हे तर अन्याय करण्यावर दडपण आणणे होय व्यवहार बंद ठेवणे म्हणजे हारताळ तेही इच्छेने सक्तिने नव्हे अर्थात सामान्य लोकांची फार मोठी गैरसोय होवु नये जनजीवन विस्कळीत होवु नये शासनहि हा मार्ग वरचेवर वापरता येत नाही.

३) बहिष्कार :-

या चळवळीमुळे ब्रिटिश सरकारला राज्यकारभार करणे कठिण करणे असा गांधीजींचा उद्देश होता त्यामुळे स्वातंत्र देणे त्यांना भाग पडेल गांधीजींनी १९२० ते १९३० या पहिल्या दशकात या मार्गाचा अवलंब केला त्यानुसार शासकिय कार्यालये शाळा कॉलेजेस न्यायालये कचेऱ्या कायदेमंडळ स्थानिक स्वराज्य संस्था विदेशी वस्तु (खास करुन कापड) इत्यादीवर बहिष्कार टाकला अर्थात संस्था विदेशी वस्तु ही चळवळ राबिवताना अहिंसा तत्व त्यांनी पाळले पाहिजे याबद्दल गांधी आग्रही होते.

• भारतात आगमन आणि पारंपारिक लढे :-

१९१५ साली गांधीजी भारतात परत आले नामदार गोखले यांनी त्यांना मार्गदर्शन केले गांधीजींनी त्यांना आपले राजकीय गुरु मानले गांधीजींनी प्रथम आपला देश पाहण्याचे लोकांना जाणून घेण्याचे ठरवुन देशभर प्रवास केला लोकांची खरी परिस्थिती त्यांना कळाली १९१६ साली साबरमती आश्रम स्थापन केला देशसेवेला त्यांनी वाहून घेतले अन्याय दुर करण्यासाठी आणि मानवी हक्क मिळवण्यासाठी त्यांनी सत्याग्रह हा नवीन मार्ग जनतेसमोर

Scanned by CamScanner

ठेवला समजावून दिला. लोकांनी त्यांना उत्स्फूर्त असा पाठिंबा दिला. गांधीजींनी खालीलप्रमाणे प्रारंभिक लढे दिले.

- **चंपारण्य सत्याग्रह :-**

गांधीजींची ही भारतातील पहिली सविनय कायदेभंग चळवळ होय. बिहारमधील निळीचे मळे इंग्रजांच्या मालकीचे व त्यात राबणारे मजुर भारतीय होते. त्यांच्यावर इंग्रज जुलूम करित होते. तसेच नीळ व्यापारी भारतीयांच्या मालाला योग्य मोबदला देत नव्हते. हा अन्याय दुर करण्यासाठी गांधीजींनी चंपारण्यास भेट दिली. राजेंद्र प्रसाद, कृपलानी, देसाई सोबत होते. तेथील ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना धमकावुन परत जाण्यास सांगितले पण त्यांनी नकार दिला. सत्याग्रह व प्रसंगी तुरुंगवासाची तयारी ठेवली. त्याचबरोबर इंग्रजांनी माघार घेतली आणि शेतकरी कामगारावरील अन्याय दुर झाला.

- **खेडा सत्याग्रह :-**

१९१८ साली दुष्काळामुळे गुजरातमधील खेडा जिल्ह्यावर भयंकर परिस्थिती ओढावली. सरकारने मदत न करता कर वसुलीची सक्ती केली. गांधीजींनी शेतकऱ्यांना संघटित करुन शेतसारा न देता सत्याग्रह पुकारला. सरदार पटेलांनी यावेळी त्यांना साथ दिली. सरकारला सवलत देणे भाग पडेल.

- **गिरणी कामगारांसाठी पहिले उपोषण :- (१९१८)**

अहमदाबाद येथील कापड गिरण्यांचे मालक कामगारांची पिळवणुक करीत होते. गांधीजी त्यांचा संप घडवला. पण मालक दाद देत नव्हते. शेवटी गांधीजींनी त्यासाठी उपोषण सुरु केले. ते त्यांचे पहिले उपोषण चार दिवस चालले. गिरणी मालकांनी तडजोड

GoodLuck Page No.
Date

मान्य केली उदा. वेतनवाढ मान्य झाली गांधीजींना यश आले अशा रितीने गांधीजींनी वेगवेगळ्या कारणांसाठी सत्याग्रह मार्गांनी यशस्वी संघर्ष सुरु केला. त्यांचे नेतृत्व आता देशभर स्वीकारले गेले.

A) असहकार चळवळ :-
महात्मा गांधीजींचा ब्रिटीशांच्या न्यायव्यवस्थेवर विश्वास होता ते देतील त्या सुधारणा स्वीकारुन आपला विकास होईल त्यासाठी इंग्रज सरकारला सहकार्य केले पाहिजे असे त्यांचे मत होते आणि केवळ त्यांच्यामुळे १९१९ च्या सुधारणा स्विकारण्याचे ठरवुन अमृतसर काँग्रेसने तसा ठराव पास केला पण अशा घटना घडल्या आणि सरकारने असे निर्णय घेतले की केवळ सहा महिन्यांत गांधीजींचा इंग्रजावरील विश्वास उडाला आणि त्यांनी सरकार-विरुद्ध संघर्षाचा निर्णय घेतला यातुनच गांधीजींनी असहकार चळवळ पुकारली.

- असहकार चळवळीची कारणे :-

1) रौलेट कायदे :-
बंगालच्या फाळणीच्या निर्णयापासुन भारतीय जनतेमधील असंतोष वाढला होता. क्रांतिकारकांच्या तसेच राजकीय चळवळीतही वाढ झाली होती त्याचबरोबर सरकारची दडपशाही देखील वाढली होती. हिंदी लोकांच्या राजद्रोही हालचाली रोखण्यासाठी मि. रौलेट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली तिच्या शिफारशीनुसार १९१९ साली सरकारने दोन कायदे केले त्याला रौलेट कायदे म्हणतात त्यानुसार व्यवस्था केली की राजद्रोही व्यक्तिवरील खटला उच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांच्या विशेष न्यायालयात गुप्तपणे चालेल त्याविरुद्ध अपील करता येणार नाही तसेच अशा आरोपीला जामीन देण्याचे टाळणे किंवा न सोडणे पोलीस कचेरीत रोज हजेरी लावणे इत्यादीबाबत प्रांत सरकार सक्ती करु शकेल.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

## २) जालियनवाला बाग हत्याकांड :-

या देशाच्या इतिहासातील एक अत्यंत क्रूर अमानवी कटू घटना म्हणजे १९१९ चे जालियनवाला बाग हत्याकांड होय त्याचे नावच हत्याकांड आहे यावरुन ते किती भयानक असेल याची कल्पना येते रौलेट कायदयावरुन पंजाबमध्ये संघर्ष वाढला होता मोर्चे हरताळ निषेध चालु होते. त्यावरुनच सरकारही हट्टाला पेटले होते १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरच्या जालियनवाला बागेत निषेध सभा आयोजित केली होती २० हजार लोक सभेला हजर होते सभेच्या ठिकाणी जाण्यास एकच अरुंद मार्ग होता बाकी सर्व बाजूंनी परांगण बंदिस्त होते. सभा चालु असताना जनरल डायर या इंग्रज अधिकाऱ्याने गाड्या उभ्या करुन रस्ता बंद केला आणि जमावावर अचानक क्रूरपणे गोळीबार सुरु केला १६०० फैरी झाडल्या दारुगोळा संपल्याने गोळीबार अचानक थांबवला गेला शेकडो निष्पाप लोक पटापट मारले गेले हजारो जखमी झाले त्यांना पिण्यास पाणीही मिळाले नाही सरकारी आकडे वारीनुसार ४०० लोक मारले गेले प्रत्यक्षात १००० हजारहून अधिक लोकांची अमानुषपणे हत्या केली म्हणूनच त्याला हत्याकांड असे म्हटले आहे.

## ३) खिलापत चळवळ :-

तुर्कस्तानचा खलिफा हा सर्व मुस्लीमांचा प्रमुख मानला जात होता त्याने पहिल्या महायुद्धात इंग्लंडविरुद्ध जर्मनीच्या बाजूने भाग घेतला तेव्हा इंग्लंड सरकारने भारतीय मुस्लीमांना आश्वासन दिले की युद्धानंतर तुर्की साम्राज्याचे विभाजन करणार नाही युद्धात भारतीय मुस्लीमांनी इंग्लंडला पाठिंबा द्यावा पण युद्धात समाप्तीनंतर इंग्लंडने आश्वासन पाळले नाही त्याविरुद्ध हिंदी मुस्लीमांनी खिलापत चळवळ उभारली महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली कांग्रेसने या चळवळीला पुर्ण पाठिंबा

Scanned by CamScanner

दिला त्यामुळे नोव्हेंबर १९१९ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय खिलाफत परिषदेचे अध्यक्षपद महात्मा गांधीजींना दिले. परिषदेत सरकारला इशारा दिला की तुर्कस्तानचा प्रश्न योग्यरित्या सोडवला नाही तर बहिष्कार व असहकार पुकारला जाईल पुढील महिन्यात अमृतसरला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनास मुस्लीम नेते हजर राहिले. दोन्ही नेत्यांनी संयुक्त परिषद भरवली.

4) हंटर कमिशन :-

जालियनवाला बाग हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी हंटर कमिशन नेमले त्यात इंग्रज सदस्य बहुसंख्य होते. २३ मे १९१९ रोजी प्रसिद्ध केलेल्या अहवालात सरकारी धोरणाचे समर्थन होते. जन. डायरला दोषी ठरवुन सेवानिवृत्त केले पण ले. गव्हर्नर व सरकारला निर्दोष ठरवले भारतातील युरोपियांनी डायरला इंग्रज साम्राज्याचा त्राता ठरवुन त्याच्या गौरवासाठी फंड उभारला या अहवालाविरुद्ध भारतात तीव्र असंतोष पसरला. काँग्रेसने तसा ठराव पास केला. गांधीजींनी आता सरकारविरुद्ध आंदोलन करायचे ठरवले.

- १९२० च्या असहकार चळवळीचे स्वरुप :-

महात्मा गांधीजींना आतापर्यंत काही विषयापुरती आणि विशिष्ट ठिकाणी असहकार चळवळ यशस्वीपणे राबवल्याचे आपण पाहिले होते त्यात खिलाफत प्रश्नावरुन सुरु केलेल्या आंदोलनाची भर पडली. या अनुभवावरुन गांधीजींचा व काँग्रेस पक्षाचा विश्वास वाढला होता. तेव्हा आता व्यापक स्वरुपात या प्रकारे सरकारविरुद्ध लढा उभारण्याचा महात्मा गांधी विचार करु लागले आणि लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली ४ सप्टेंबर १९२० रोजी कलकत्ता येथे भरलेल्या काँग्रेसच्या खास अधिवेशनात महात्मा गांधींनी असहकार आंदोलनाचा ठराव मांडला आणि तो पास अधिवेशनात महात्मा गांधींनी असहकार आंदोलनाचा ठराव मांडला आणि तो पास झाला यानंतर २६ डिसेंबर १९२०

रोजी कॉंग्रेसचे नियमित वार्षिक अधिवेशन नागपुरला भरले त्याला १४००० प्रतिनिधी हजर होते. महात्मा गांधी जीचे नेतृत्व सर्वसामान्य झाले पुढे स्वातंत्र्य मिळेपर्यंत कायम राहिले.

## • असहकार चळवळीचा कार्यक्रम :-

कलकत्ता अधिवेशनात असहकार चळवळीचे स्वरुप पुढीलप्रमाणे ठरले.

1) ब्रिटिश सरकारने दिलेल्या पदव्या मानसन्मान अधिकारपदे त्यांचा त्याग करणे
2) स्वदेशी मालाचा वापर व परदेशी मालावर बहिष्कार
3) सरकारी सभा, कार्यक्रमांना हजर न राहणे.
4) सरकारी शाळा महाविद्यालये विद्यापिठे यावर बहिष्कार आणि राष्ट्रीय शाळांमध्ये प्रवेश घेणे.
5) ब्रिटिश न्यायालयावर बहिष्कार आणि न्यायपंचायती सुरु करणे
6) कायदेमंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार
7) मेसापोटियात कोणाही हिंदी माणसाने नोकरीवर जाऊ नये
8) स्थानिक स्वराज्य संस्था कायदेमंडळ यांचे त्यागपत्र देणे.

यांप्रमाणे गांधीजींच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसने देशव्यापी आक्रमक धोरण स्विकारले साम्राज्यांतर्गत वसाहतींचे स्वराज्य ध्येय ठरविले ऑगस्ट १९२० ते फेब्रुवारी १९२२ पर्यंत सरकारशी या स्वरुपात संघर्ष चालु होता.

## • असहकार चळवळीची वाटचाल :-

### 1) विधायक स्वरुपाचे कार्य

असहकार चळवळ विधायक आणि नकारात्मक अशा दोन स्वरुपात राबवली गेली स्वदेशीचा जोरदार पुरस्कार प्रचार आणि अंमलबजावणी केली. स्वदेशी मालाच्या उत्पादनासाठी उदयोगधंदयांना प्रोत्साहन दिले विशेषतः हातमागाच्या व्यवसायाचे पुनरुज्जीवन करणेचा प्रयत्न केला. स्वदेशी

Scanned by CamScanner

चळवळीसाठी काँग्रेसने लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ एक कोटी रुपयांचा फंड 'स्वदेशी फंड' या नावाने गोळा करण्याचे ठरविले आणि अपेक्षेपेक्षाच ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा १५ लाख रु जादा जमवले गेले. या रकमेतुन २० लाख चरखे सुतकताईसाठी घराघरात फिरु लागले हातमागावरील खादीचा जोरदार प्रचार होऊ लागला दारुबंदीचा प्रचार अस्पृश्यता निवारण हिंदु मुस्लीम ऐक्य इत्यादीसाठी प्रचाराचे कार्य केले होते.

2) पदव्या मानसन्मानाचा त्याग :-

गांधीजींनी केसर इ हिंद या पदवीचा त्याग केला रविंद्रनाथ टागोर यांनी 'सर' चा तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आय सी एस ' पदवीचा त्याग केला त्यापासुन प्रेरणा घेऊन अनेक भारतीयांनी आपल्या पदव्या नोकरींचे राजीनामे दिले हजारो विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजवर बहिष्कार घालुन राष्ट्रीय शिक्षण पसंत केले सी आर दास मोतीलाल नेहरु जवाहरलाल नेहरु वल्लभभाई पटेल राजेंद्रप्रसाद लाला लजपतराय विठ्ठलभाई पटेल राजगोपालचार्य चिंतामणी केळकर यांनी आपल्या वकिलीचा त्याग करुन न्यायालयावर बहिष्कार टाकला. मौलाना कलाम मौलाना महमंद शौकत आली इत्यादी मुस्लीम नेत्यांनी असहकार चळवळीतील सक्रिय भाग घेतला.

3) बहिष्काराचा वापर :-

१९१९ च्या सुधारणा कायद्यानंतर घेण्यात आलेल्या निवडणुकांवर बहिष्कार घातला त्यामुळे समाजात फारसे स्थान नाही अशा इतर पक्षांचे लोक कायदेमंडळात निवडून गेले परदेशी मालावर आणि विशेषत: परदेशी कापडावर बहिष्कार घातला दुकानदारांकडून परदेशी कापड विकत घेऊन त्याची होळी करावी असे प्रत्यक्ष गांधीजींनी सांगितले होते.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

भारतात राजकीय असंतोष कमी करण्यासाठी ब्रिटिश राजपुत्र प्रिन्स ऑफ वेल्स यांनी भारताला भेट दिली त्याचे स्वागत जोरदारपणे व्हावे असे हिंदुस्थान सरकारला वाटत होते पण प्रत्यक्षात तसे झाले नाही कॉंग्रेसने त्यांच्या भेटीवर बहिष्कार टाकला.

4) सी आर दास यांचे कार्य :-

बंगालचे सी आर दास यांच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ प्रभावीपणे राबविले त्यांचे पुत्र चित्तरंजन व सुन वासंतीदेवी ~~त्यांचे पुत्र चित्तरंजन~~ व यांनी त्यातुन तुरुंगवास पत्करला त्यांच्या पत्नीही चळवळीत उतरल्या त्यामुळे हजारो कार्यकर्ते सामील झाले पोलिसांनी आटकसत्र आवलंबिले सर्व तुरुंग भरुन गेले कॅम्प तुरुंगही भरले तेव्हा नाईलाज होऊन कैदी सोडून दिले दास यांचा चळवळीत मोठा वाटा होता.

- सरकारची दडपशाही :-

चळवळ देशभर पसरली होती लोक उत्स्फुर्तपणे त्यात सामील होत होते त्याचवेळी ब्रिटिश सरकारनेही कठोर धोरण राबवुन चळवळ दडपुन टाकण्याचे प्रयत्न चालविले होते लाठीमार गोळीबार आटकसत्र आवलंबिले १९२१ पर्यंत २० हजार कार्यकर्त्यांनी कैद केले जानेवारी १९२२ मध्ये आणखी हजार लोकांना कैदेत डांबले गांधीजींनी व्हाईसरायना कळवले दडपशाही बंद करा अन्यथा साराबंदीच्या बार्डोली सत्याग्रहाला तयार रहा त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांसोबत बार्डोलीस दाखल झाले तेवढ्यात चौरीचौरा घटना घडली आणि असहकार चळवळ थांबवली गेली.

- असहकार चळवळीची समाप्ती :-

५ फेब्रुवारी १९२२ रोजी चळवळीला हिंसक वळण लागले उत्तर प्रदेशातील चौरीचौरा या गावी एका मिरवणुकी वर पोलिसांनी गोळीबार केला त्यामुळे संतप्त जमावाने

Scanned by CamScanner

पोलिसांनी कचेरीस आग लावली त्यात २१ पोलिस व एक फौजदार मरण पावले ही हिंसक घटना गांधीजींना आवडली नाही लोकांना अहिंसेचे महत्व कळल्याशिवाय सविनय कायदेभंग यशस्वी होणार नाही आणि हिंसक चळवळ अधिक हिंसक मार्गाने सरकार दडपून टाकू शकेल हे गांधीजींनी माहित होते म्हणुन सदर घटना घडल्या-बरोबर महात्मा गांधीजींनी असहकार चळवळ समाप्त केली १२ फेब्रुवारीला काँग्रेस वर्किंग कमीटीने बार्डोली येथे बैठकीत निर्णय घेतला व गांधीजींचा निर्णय मान्य केला चळवळ अधिकृतपणे थांबवली हा निर्णय न आवडल्याने मोतीलाल नेहरु, लाला लजपतराय, मौलाना आझाद नेताजी सुभाषचंद्र इत्यादी नेत्यांनी त्याचा निषेध केला पण गांधीजींचा निर्णय स्वीकारला सरकारने १० मार्च १९२२ मध्ये गांधीजींना अटक केली. आरोप ठेवले गांधींनी ते मान्य केले त्यांना सहा वर्षाची शिक्षा झाली.

- **असहकार चळवळीचे मुल्यमापन :-**

असहकार चळवळीचे मुल्यमापन किंवा परिक्षण करताना त्यामध्ये यशापयश असा दोन्ही गोष्टी दिसतात चळवळीला पूर्णपणे अपेक्षीत यश मिळाले नाही हे खरे असले तरी अनेक गोष्टी साध्य केल्या हेही नाकारता येणार नाही चळवळ थांबवताच सरकारने दडपशाही राबवली प्रथम आपण चळवळीच्या अपयशाचा शोध घेऊ

- **चळवळीच्या अपयशाची कारणे :-**

1) महात्मा गांधींनी अचानकपणे चळवळ थांबवली त्यामुळे सर्व नेते निराश झाले गांधीजींना हिंसाचार आजिबात मान्य नव्हता हे खरे पण एवढ्या मोठ्या देशात चाललेल्या चळवळीत शिस्त राखणे अवघडही होते किंबहुना जनतेला तसे प्रशिक्षणही नव्हते अर्थात गांधीजींनी हे कबुलही केले की लोकांना प्रशिक्षीत केल्याशिवाय त्यांची मानसिकता

Scanned by CamScanner

झाल्याशिवाय अशी चळवळ राबवणे चुक आहे. तेव्हा ही परिस्थीती अपयशाला कारणीभुत ठरते.

२) हे आंदोलन खिलापत चळवळीशी जोडले गेले मुस्लीमांचा पांठिबा मिळावा हा त्यामागील हेतु होता पण ती चुक ठरली खर तर खिलापत प्रकरण हे धार्मिक होते आणि असहकार चळवळ राजकिय स्वरुपाची होती तेव्हा धर्मकारणाची राजकारणाशी सांगड घालणे योग्य नव्हते शिवाय हिंदु मुस्लीम ऐक्य साधण्याचा हेतुही सफल झाला नाही ज्या तुर्कीसाम्राज्य व खलिफासाठी हा प्रयत्न केला त्या तुर्कस्थानामध्येच १९२२ साली उठाव होवुन खलिफाची सत्ता गेली आणि गणराज्य आले तेव्हा खिलाफतचा प्रश्न राष्ट्रीय प्रश्नाबरोबर जोडण्यात चुक झाली.

३) एका वर्षात स्वराज्य मिळवुन देण्याचे गांधीजी बोलले होते पण तसे झाले नाही आणि शक्यपण नव्हते सुभाषचंद्र बोस यांनी तर या कल्पनेला अविवेकपुर्ण आणि लहान मुलासारखे बोलणे म्हटले होते कांग्रेसमधील अनी बेझंट बिपीनचंद्र पाल, लाला लजपतराय व जीनी मदनमोहन मालवीय मुंजे खापर्डे इत्यादी महत्वाच्या नेत्यांचा या चळवळीला विरोध होता.

४) पदव्या मानसन्मान त्याग करणे बहिष्कार घालणे चळवळीत महत्वाची होते. अनेकांनी तसे केलेही पण त्यांचे प्रमाण कमी होते. सर्वांनी याप्रमाणे केले असते तरी चळवळ अधिक प्रभावी व परिणामकारक ठरली असती पण तसे झाले नाही अशा प्रकारे लहानमोठ्या अनेक कारणामुळे चळवळ अपयशी ठरली.

अर्थात वरीलप्रमाणे चळवळीत काही दोष उणिवा असल्या व अपयश दिसत असले तरी त्यापेक्षा तिचे यश अधिक मोठे होते. चळवळीचे उल्लेखनीय यश खालीलप्रमाणे

Scanned by CamScanner

GoodLuck Page No. Date

1) राष्ट्रीय चळवळ सामान्यांपर्यंत पोहचली :-

अरसहकार चळवळीमुळे हिंदी राजकारणात नवीन युगाची सुरवात झाली आतापर्यंत फक्त शहरी मध्यम वर्गापुरती असलेली राष्ट्रीय चळवळ आता सामान्य मानसापर्यंत खेड्यापाड्यापर्यंत पोहचली हे फार मोठे यश होते डॉ. राजेंद्रप्रसाद ब्रिटीशांचे भारतीयांशी संबंध प्रस्थापित झाल्या पासुन इतका उत्साह व निर्धार जनतेमध्ये पूर्वी कधीच दिसुन आला नाही.

2) काँग्रेस कृतिशील बनली :-

आतापर्यंत काँग्रेसच्या व्यासपीठावर केवळ चर्चा व वादविवाद होत गेले असहकार चळवळीमुळे ते कृतिशील व्यासपीठ बनले हे यश पंडित नेहरूंच्या शब्दात देणे योग्य ठरेल. ते म्हणतात पूर्वी आम्ही सरकारशी संघर्ष येणार नाही अशा प्रकारचे शब्दप्रयोग करण्यात बराच वेळ खर्च करत असुन आता आम्हाला काय पाहिजे ते स्पष्ट शब्दात ठणकावुन सांगु लागलो नेताजी सुभाषचंद्र यांनी काही बाबतीत टिका केली असली तरी चळवळीचे यश सांगताना ते म्हणतात १९२१ च्या वर्षाने देशाला राष्ट्रसभेची बळकट संघटना मिळवून दिली या संघटनेचे स्वरूप क्रांतीकारी बनवण्याचे श्रेय गांधीजींना आहे देशभर एकच धोरण व एकच घोषणा असे चित्र निर्माण झाले.

3) सरकारची भिती नष्ट झाली :-

या चळवळीने सामान्य मानसांची तुरुंगवास आणि सरकारबद्दलची भीती दुर झाली हजारो लोक पोलिसांचा लाठीमार खाण्यास व तुरुंगात जाण्यास आनंदाने तयार होऊ लागले. लवकरच सर्व तुरुंग आणि कॅम्पही भरून गेले. तेव्हा कैद्यांना सोडून द्यावे लागले पण ते बाहेर जाईनात म्हणुन पोलिसांनी त्यांना सक्तीने बाहेर आणून सोडले ~~अशा~~ पण ते बाहेर जाईनात म्हणून पोलिसांनी त्यांना सक्तीचे बाहेर आणून सोडले. अशा सत्याग्रहींनी

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

कसे वागावे हेच पोलिस व सरकारला कळेनासे झाले हा या चळवळीचा मोठा विजय होता.

4) स्वराज्य हे ध्येय ठरले :-
आतापर्यंत सुधारणा मागणाऱ्या कॉंग्रेसचे नजीकचे ध्येय आता स्वराज्य ठरले. हा तिचा ध्येय धोरणातील मुलभूत फरक होय म्हणुन पंडीत नेहरु म्हणतात हिंदी राष्ट्रवादातच या चळवळीने नवजीवन चैतन्य निर्माण केले याशिवाय चळवळीने अनेक विधायक कार्याची सुरुवात केली नेते कार्यकर्त्यांची पिढी तयार केली सरकारने दिलेल्या पदव्या व मानसन्मानाबद्दल जनतेत तिरस्कार निर्माण झाला शेवटी डॉ आर सी मुजूमदार यांच्या शब्दात लिहावे वाटते की असहकार चळवळीचे पूर्ण संपूर्ण यशस्वीही झाले नाही आणि संपूर्ण अयशस्वीपणे झाले नाही.

5) सविनय कायदेभंग चळवळ :-
अभ्यासक्रमानुसार गांधीयुगातील असहकार सविनय कायदेभंग आणि चलेजाव अशा तीन चळवळींचा आपणाला अभ्यास करावयाचा आहे. पण या कालखंडात काही अशा राजकीय घटना घडल्या आहेत की त्यात महात्मा गांधीजींचा सहभाग नव्हता पुढील चळवळीच्या अभ्यासकडे जाऊ शकणार पण त्यामुळे त्या घटनांचा उल्लेख न करता आपण पुढील चळवळीच्या अभ्यासाकडे जाऊ शकणार नाही अन्यथा राष्ट्रीय चळवळीचा आणि मुख्य चळवळीच्या अभ्यासाकडे जाऊ शकणार नाही अन्यथा राष्ट्रीय चळवळीचा अखंड प्रवाह स्पष्ट होणार नाही म्हणून या घटनांचा थोडक्यात आढावा घेत राहू आणि मुख्य चळवळीच्या अभ्यासावर लक्ष केंद्रीत करु या दृष्टीने पाहता महात्मा गांधीशिवाय पण कॉंग्रेस अंतर्गत स्थापन केलेल्या स्वराज्य पक्षाची पुढीलप्रमाणे आपण थोडक्यात नोंद घेत आहोत

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

## • स्वराज्य पक्षाची स्थापना :-

फेब्रुवारी १९२२ मध्ये महात्मा गांधीजींनी चळवळ थांबवली त्यांचा हा निर्णय अनेक नेत्यांनी आवडला नाही त्यांची लोकप्रियता कमी झाल्याचे ओळखून सरकारने त्यांना १० मार्च रोजी अटक केली खटला भरून सहा वर्षे कैदेची शिक्षा दिली राष्ट्रीय चळवळ थंड झाली मोतिलाल नेहरु सी आर दास इत्यादी नातेमंडळांनी हे मान्य नव्हते कायदेमंडळाच्या निवडणुका जवळ आल्या होत्या तेव्हा त्या निवडणुका लढण्यात आणि कायदेमंडळात सरकारची अडवणूक करावी असे या नेत्यांना वाटत होते पण गांधीजींचा त्यास विरोध होता परिणामी कॉंग्रेसमध्ये दोन गट पडले निवडणूक लढवू पाहणारे फेरवादी तर विरोध करणारे नाफेरवादी शेवटी तडजोड झाली कॉंग्रेसने संमती दिली पण त्यांनी कॉंग्रेसच्या नावे निर्णय नंतर पुढील महिन्यात ठरेल सप्टेंबर १९२३ च्या दिल्ली कॉंग्रेसच्या या निर्णयानंतर पुढील महिन्यात नेहरु दास यांनी अलाहाबाद येथे कॉंग्रेसअंतर्गत स्वराज्य पक्ष स्थापन केला.

कायदेमंडळाच्या निवडणुका लढवून जनतेचे प्रश्न सोडविण्यास सरकारला भाग पाडणे तेथील संधिसाधु प्रतिनिधींची हकालपट्टी करणे जनजागृती करणे देशाची छलना बदलणे असे अनेक उद्देश स्वराज्यपक्षाने ठरवले होते.

त्यानुसार हिंदी कायदेमंडळाच्या १९२३ साली निवडणुका लढविल्या १४५ पैकी ४८ जागा जिंकल्या २४ स्वातंत्र सदस्यांचे सहकार्य घेतले लोकजागृती केली राज्यकर्त्यांवर अंकुश ठेवला स्वराज्य या आपल्या मागणीची पुर्तता होण्यासाठी गोलमेज परिषदेची मागणी केली असहकार चळवळ थांबवल्यावर चार पाच वर्ष राजकीय लढा ठेवण्याची कामगीरी केली राज्यकर्त्यां कडून भारतीयांची आर्थिक पिळवणूक थांबवणे व व औद्योगिक विकास साधण्याचा प्रयत्न केला.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

## सायमन कमिशन :-

१९१९ च्या कायद्याच्या आमंलबजावणीचे परिक्षण करणे सरकारच्या कार्याचे शिक्षण व्यवस्था स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास परिक्षण इत्यादी उद्दिष्ट्यांसाठी ब्रिटिश सरकारने ८ नोव्हेंबर 1927 रोजी सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली 7 सदस्यांचे एक कमिशन नेमले हे सर्व सदस्यांचे एक कमिशन नेमले हे सर्व सदस्य इंग्रज असुन त्यात एकही हिंदी सदस्यांचा समावेश नव्हता त्यामुळे हिंदी जनतेत या कमिशनविरुद्ध संतापाची लाट उसळली कमिशन जेथे जेथे गेले तेथे तेथे जनतेत या कमिशनविरुद्ध संतापाची लाट उसळली. कमिशन जेथ हरताळ पाळला मोर्चे काढले लाहोरमध्ये लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली असाच मोर्चा निघाला असता पोलिसांनी भयंकर लाठीमार केला. कमिशन दोन वेळा हिंदुस्थानाला भेट दिली दोन वर्षाच्या परिश्रमानंतर मे १९३० मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला त्यातील महत्त्वाच्या शिफारशी खालीलप्रमाणे.

1) प्रांतातील द्विदल राज्यपद्धती रद्द करावी सर्व खाती लोकप्रतिनिधीकडे द्यावीत व सर्व मंत्री कायदेमंडळाला जबाबदार असावेत.

2) गव्हर्नरला अनेक खास अधिकार असावेत

3) एकुण लोकसंख्येच्या 10 ते 15% लोकांना मताधिकार मिळावा

4) लष्कराचे हिंदीकरण करावे पण संरक्षणाची पुरेशी व्यवस्था होईपर्यंत ब्रिटिश फौज हिंदुस्थानात असावी.

5) प्रांत व संस्थानाच्या प्रतिनिधींचे संघराज्य केंद्रात असावे पण त्यात सामील होण्याची संस्थानाना सक्ती नसावी

6) प्रांतीय कायदेमंडळात सदस्य संख्या २०० ते २५० असावी.

याप्रमाणे महत्त्वाच्या शिफारशी होत्या हिंदी जनतेत या कमिशनवर बहिष्कार घातला होता त्यामुळे त्यांच्या अहवालावर टिका होणे साहाजिकच होते उदा. या कमिशनच्या अहवालाने भारताच्या घटनात्मक साहित्यात भर पडली असे वर्णन केले आहे.

GoodLuck Page No.
Date

## • नेहरु रिपोर्ट :

सायमन कमिशनवरील बहिष्कार सहन न होईल भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनी हिंदी नेत्यांना आव्हान केले की त्यांनी भारतीय घटनेबद्दलचा यांनी नेत्यांनी आव्हान केले की त्यांना भारतीय घटनेबद्दलचा मसुदा एकमताने दयावा तो ब्रिटिश सरकारपुढे दयावा त्यांचे आव्हान स्विकारुन कॉंग्रेस मुस्लीम लीग व हिंदु महासभा एकत्र आले आणि मोतिलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी १९ मे १९२८ रोजी एक समिती नेमली मोठे कष्ट घेउन समितीने आपला रिपोर्ट तयार केला त्यातील महत्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे होत्या

1) हिंदुस्थानात ~~साम्राज्यांतर्गत~~ संघराज्य असेल आवश्यक स्वायत्तता प्रांतांना असेल प्रांतात एकगृही कायदेमंडळ असेल ~~केंद्र~~ केंद्र व प्रांत यांच्यात विषम वाटणी होईल.

2) साम्राज्यांतर्गत स्वराज्य लगेच आणि तद्नंतर पूर्ण स्वमत हेच ध्येय असेल.

3) हिंदुस्थानात निधर्मी राष्ट्र असेल अल्पसंख्यांकाच्या संस्कृती व हक्कांचे रक्षण केले जाईल त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ नव्हे तर राखीव जागा असतील.

4) हिंदी लोकांना मुलभुत हक्क असतील १९ मुलभूत हक्कांची यादी दिली)

5) केंद्रीय कायदेमंडळ इंग्लडचा राजा व द्विगृहाचे असेल प्रांताचे प्रतिनिधी वरिष्ठ गृहाचे तर प्रौढ मतदानाने हिंदी जनतेने निवडून दिलेले प्रतिनिधी कनिष्ठ सभागृहाचे सदस्य असतील

6) गव्हर्नर जनरलने प्रधानमंत्र्याची निवड करावी व त्यांच्या सल्ल्याने इतर मंत्री निवडावेत मंत्रीमंडळ कायदेमंडळाला जबाबदार असेल.

7) प्रांताच्या गव्हर्नरांची नेमणुक इंग्लडच्या राजाने करावी गव्हर्नर मुख्यमंत्र्याची व त्याच्या सल्लाने मंत्रिमंडळ तयार करेल प्रांतिक कायदेमंडळाची मुदत पाच वर्षाची असेल गव्हर्नर कमी जास्त करु शकेल.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

१) गव्हर्नर जनरलने सर्वोच्च न्यायाधीशांची नेमणुका करावी त्याला दुर करण्याचा हक्क पार्लमेंटला असेल.

या रिपोर्टवर खुप चर्चा झाली. शेवटी महात्मा गांधीनी मध्यस्थ करुन काँग्रेसला एकमताने रिपोर्ट स्वीकारण्यास भाग पाडले तसेच एका वर्षाच्या म्हणजे १९२९ अखेर त्याची आमंलबजावणी करावी असे सरकारला कळवले. अन्यथा त्यानंतर स्वातंत्र्य चळवळ तीव्र केली जाईल.

## • सविनय कायदेभंग चळवळ :-

ब्रिटिश सरकारविरुद्ध महात्मा गांधीनी फेब्रुवारी १९३० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ पुकारली ही त्याची दुसरी चळवळ होय. सविनय कायदेभंग चळवळ पुकारली ही त्याची दुसरी चळवळ होय. असहकार चळवळ थांबवल्यानंतर घडलेल्या अनेक घटना वरीलप्रमाणे आपण थोडक्यात पहिल्या या घटनेतुन कायदेभंग चळवळीला अनुकूल वातावरण तयार होत गेले आणि गांधीजी त्या निर्णयापत आले. गांधीयुगातील ही दुसरी चळवळ होय.

## • लाहोर अधिवेशन :- (३१ डिसेंबर १९२९)

काँग्रेसच्या इतिहासात लाहोर आधिवेशनाला फार मोठे महत्व आहे गांधीनी आंदोलन तीव्र करण्याचे ठरविले अशा परिस्थीतीत हे आधिवेशन भरले होते. पंडीत जवाहरलाल नेहरु त्याचे अध्यक्ष होते. त्यांनी इंडियन इंडिपेडन्स युथ लिग ही स्वातंत्र्याच्या मागणीचे ठाम पुरस्कर्ते होते त्यांनी इंडियन इंडिपेडन्स युथ लीग ही काँग्रेस अंतर्गत संघटना स्थापून आपल्या मताचा प्रसार केला आणि आता त्याच्यात अध्यक्षतेखाली लाहोर आधिवेशन होत होते त्याला १५ हजार लोक हजर होते या आधिवेशनात संपुर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाचा स्वीकार केला गांधीजींनी त्याला मान्यता दिली साम्राज्यातंर्गत स्वराज्य हे नेहरु रिपोर्टमधील ध्येय बाजुला केले आता देशाला संपूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावाचा स्वीकार ~~केला. गांधीजींना~~ हे ध्येय ठरवुन त्यासाठी गांधीजींच्या

Scanned by CamScanner

नेतृत्वाखाली सविनय कायदेभंग चळवळ सुरु करण्याचा काँग्रसने निर्णय घेतला तसा ठराव पास केला पंडीत नेहरुंनी व्यासपिठावरुन ३१ डिसेंबर १९२९ रोजी रात्री बारा वाजता संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली २६ जानेवारी १९३० हा भारताचा स्वातंत्र्यदिन म्हणुन पाळण्याचे ठरविले त्याच दिवशी स्वातंत्र्याची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली महात्मा गांधींनी लॉर्ड आयर्विन यांना पत्राद्वारे आपल्या मागण्या मान्य करण्यास सांगितले पण त्यांनी मान्यता दिली नाही.

- **सविनय कायदेभंग चळवळीचा कार्यक्रम :-**

1) मीठ व तत्सम अन्यायी कायदयाचा भंग करणे
2) शेतसारा व अन्य सरकारी कर न देणे
3) निवडणुका, न्यायालये, कौन्सिल, सरकारी समारंभ, शाळा कॉलेज स् इत्यादींवर बहिष्कार घालणे
4) परदेशी मालावर बहिष्कार
5) दारु व इतर नशील्या पदार्थांची विक्री दुकानासमोर निदर्शने
6) सरकरी नोकऱ्यावर बहिष्कार
7) जंगल कायदयांचा भंग करणे

- **मिठाचा सत्याग्रह :-**

सविनय कायदेभंगामध्ये मिठाच्या अन्यायकारक कायदयाचा सविनय पद्धतीने भंग करुन चळवळीला सुरवात करण्याचे महात्मा गांधीजींनी ठरवले त्यासाठी १२ मार्च १९३० ही तारीख ठरवीली अनेकांना हा निर्णय हास्यास्पद वाटला पण काँग्रसने मान्य केला. कारण नेतेमंडळांनी त्याचे महत्व ओळखले होते पंडीत नेहरु आत्मचरित्रात लिहतात की या निर्णयाचे मीठ या शब्दाला आचानक सामर्थ्य मिळाले यासारख्या साध्या वस्तुचा ~~व्यापक~~ राष्ट्रीय चळवळीशी संबंध जोडणे सोपे वाटत नव्हते पण गांधीजींनी ती किमया करुन दाखवली नेताजी सुभाषचंद्र म्हणाले ~~नेपोलियनच्या~~ ~~ज्यासारख्या~~

आणीबाणीच्या वेळी गांधीजींचे उपजत नेतृत्व किती उच्यांक गाठू शकेल याची कल्पना आम्हाला या वेळी आली

मिठाच्या सत्याग्रहासाठी गांधीजींनी दांडी हे गाव निवडले आणि त्या गावाला भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासात व नकाशावर ठळक स्थान मिळाले साबरमती आश्रमातुन आपल्या 78 अनुयायांसह महात्मा गांधी 12 मार्च 1930 रोजी पायी चालत निघाले गुजरातमधील दांडी येथे 5 एप्रिल 1930 रोजी ते पोहचले त्या दिवशी मिठाच्या कायदयाचा भंग करुन त्यांनी विनापरवाना मीठ उचलले इतर सत्याग्रहींनी देखील त्याचप्रमाणे मीठ उचलुन कायदेभंग केला गांधीजीसह सर्व सत्याग्रहींवर पोलिसांनी भयंकर लाठीमार केला सरोजनी नायडू महिला प्रतिनीधी म्हणुन या सत्याग्रहात सामील झाल्या होत्या मार्गात सामील होत गेलेले दांडी येथे सुमारे 2000 लोक गेले

## धारासना सत्याग्रह :

महात्मा गांधीनी लॉर्ड आयर्विनला या सत्याग्रहाबद्दल कळविल्याबरोबर सरकारने त्यांना अटक केली त्यामुळे चळवळीचे नेतृत्व सरोजनी नायडू यांच्याकडे आले तीन हजार सत्याग्रहींसमवेत त्यांनी हे आंदोलन केले सर्व मार्ग रोखुन पोलिसांनी लोकांना अडविण्याचा प्रयत्न केला तरी ठरवलेल्या ठिकाणी धारासना येथे सत्याग्रह झाला मिठाचा कायदा भंग केला. पोलिसांनी क्रुरपणे लाठीमार केला शेकडो लोक जखमी झाले पण जनतेचा निर्धार कायम होता पोलिसांचा मार खाण्यास आणि कैद करुन घेण्यास लोक आनंदाने पुढे येत राहिले एवढा उत्साह आणि निर्भयपणा त्यांच्याकडे होता हे या चळवळीचे खास वैशिष्ट्ये होते मागे न हटता पोलिसांचा मार सहन करीत लोक शेवटी मिठागराजवळ पोहचले सरोजनी नायडूसह इतर नेत्यांना व शेकडो नेत्यांना कैद केले महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मिठाचा सत्याग्रह

झाला मुंबई शहर आघाडीवर होते वडाळ येथील सत्या-गृहात सुमारे 15 हजार लोकांनी कायदेभंग केला रत्नागिरी जिल्ह्यातील शिरोडे येथे मिठाचा सत्याग्रह झाला भारतातील बंगाल ओरिसा, गुजरात मद्रास अशा अनेक प्रांतात मिठाचा सत्याग्रह झाला.

- कायदेभंगाच्या अन्य चळवळी :-

सविनय कायदेभंग कार्यक्रमात मिठाप्रमाणे अन्य कायद्याचा भंग केला जाईल असे घोषित केले होते यामुळे जेथे समुद्रकिनारा नव्हता तेथे अन्य अन्यायकारक कायद्यांचा भंग केला उदा. उत्तर प्रदेश, कर्नाटक, गुजरात इत्यादी प्रांतातील शेतकऱ्यांनी चळवळीत भाग घेऊन सरकारला शेतसारा देण्याचे नाकारले परदेशी मालावर बहिष्कार घातला याचाच पुढील भाग म्हणजे अनेक ठिकाणी परदेशी कापडाची होळी करण्यात आली परदेशी कापडाची वाहतुक रोखण्याचे प्रयत्न झाले त्यातुनच हुतात्मा बाबू गेनू घटना घडली. अशा कापडाचा ट्रक अडविण्यासाठी ते ट्रकपुढे आडवे पडले आणि हुतात्मे झाले. देशात काही ठिकाणी जंगल सत्याग्रह देखील झाले गांधीजींना अटक झाल्यानंतर देशात सरकारचा निषेध म्हणुन अनेक ठिकाणी हरताळ पाळ-ण्यात आला कामगारांनी संप केले सोलापुरमध्ये 6 मे 1930 रोजी हरताळ पाळला तेव्हा जिल्हा अधिकाऱ्याने लष्करी कायदा पुकारला पण जनतेने न जुमानता चळवळ राबवीली तेव्हा कायदा भंग केला म्हणुन सरकारने चार सत्याग्रहींना फाशी दिली.

महात्मा गांधींनी सुरु केलेली ही चळवळ हिंदुचे राज्य निर्माण करण्यासाठी सुरु केलेली असुन स्वराज म्हणजे मुस्लिमांचे पारतंत्र्य होय असा प्रचार मुस्लीम लीगने आणि विशेषतः बॅ. जीनांनी चालविला होता सरहद्द प्रांतातील खान अब्दुल गफारखान आणि विशेषतः यांच्याशिवाय सर्व मुस्लीम नेत्यांनी महात्माजींशी असहकार पुकारला होता.

GoodLuck Page No.
Date

## • सविनय कायदेभंग चळवळीचे महत्व :-

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत सविनय कायदेभंग चळवळीला फार मोठे महत्व आहे देशाच्या आधुनिक इतिहासाबरोबर जगाच्या इतिहासातही या अहिंसात्मक लढ्याला योग्य स्थान आहे या चळवळीची वैशिष्ट्ये आणि परिणाम पाहता तिचे महत्त्व सर्वसामान्य आहे. या चळवळीतील एक वैशिष्ट्ये असे की मुंबई गिरणी मालक कारखानदारानी या चळवळीला सढळ हाताने मदत केली चळवळीतील महिलांचा सहभाग हे दुसरे वैशिष्ट्ये होय सरोजनी नायडू तर गांधीजीच्या अटकेनंतर चळवळीचे नेतृत्व करीत आणि मागे उल्लेख केलेल्या नागा लोकांची राणी गौदिनलिऊ इत्यादी महिलांचा वाटा फार मोठा होता. तिसरे वैशिष्ट्ये असे की सरहद्द प्रांतातील पठाण लोकांनी गांधीजींचा अहिंसात्मक चळवळीचा मनःपुर्वक स्वीकार केला आणि भाग घेतला.

या चळवळीने अनेक गोष्टी साध्य केल्या ते तिचे परिणाम होत असेही म्हणता येईल उदा.

1) सविनय कायदेभंग चळवळीमुळे देशाची स्वातंत्र्य चळवळ ग्रामीण भागात खेडोपाड्यात पोहचली. आतापर्यंत शहरी भाग आणि सुशिक्षितांपुरती मर्यादीत राहिली चळवळ सर्वसामान्यांपर्यंत पोहचली.

2) समाजाच्या सर्व थरांतील लोक या चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते बनले. डॉ वकिलापासुन शेतकरी कामगारापर्यंत लोक त्यात सामिल झाले.

3) स्वातंत्र्य चळवळीचे हे बदलते विशाल स्वरुप आणि लोकप्रियता बघुन राजकीय सुधारणा देणे सरकारला भाग पडले त्यातुनच गोलमेज परिषदा आयोजित केल्या गेल्या.

4) सरकारने वापरलेली दडपशाही हाही एक परिणाम होता अनेक संघटना बेकायदेशीर ठरवुन त्यांची मालमत्ता जप्त केली उदा किसान सभा खिदमतदार चरखा संघ सेवा दल इत्यादी.

5) सरकार पोलिस तुरुंगवास ही जनतेतील भीती आता दुर झाली लोक स्वातंत्र्यासाठी पोलिसांचा, लाठीमार तुरुंगवास

Scanned by CamScanner

आनंदाने स्वीकारु लागले. त्यामध्ये त्यांना राष्ट्रभक्ती दिसु लागली हा परिणाम महत्वाचा होता तेव्हा सर्व वैशिष्ट्ये आणि परिणाम पाहता स्वातंत्र्य चळवळीमधील एक खुप महत्वाचा टप्पा असे सविनय कायदेभंग चळवळीस संबोधले जाते अर्थात चळवळ येथे थांबलेली नव्हती पण या दरम्यान घडलेल्या इतर काही राजकीय घडामोडी आणि त्यातुन स्पष्ट होणारे इंग्रज सरकारच्या धोरणाचा खालीलप्रमाणे थोडक्यात आढावा घेणे आवश्यक आहे.

- पहिली गोलमेज परिषद :- (१९३० - १९३१)

सविनय कायदेभंग चळवळ चालु असताना सायमन कमिशनचा अहवाल जाहिर झाला. त्यावर विचार करण्यासाठी इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली लंडन येथे नोव्हेंबर १९३० मध्ये पहिली गोलमेज परिषद भरली एकुण ८९ प्रतिनिधी हजर होते त्यापैकी ५७ ब्रिटिश इंडियातुन सरकारने नेमलेले असुन संस्थानिकांचे १६ प्रतिनिधी होते काँग्रेसने परिषदेवर बहिष्कार घातला होता सरकार काहीही समजत असले तरी राष्ट्रीय संघटना होती आणि तिच्याशिवाय परिषद म्हणजे केवळ राजकीय दिखावाच होता. त्यामुळे तिथे घेतले जाणारे निर्णय अर्थहिन ठरणार असे मत परिषदेला हजर असणाऱ्या तेजबहादुर सप्रु, व्ही एस शास्त्री बॅ. जयकर यांच्यासह इतर अनेक प्रतिनिधींनी व्यक्त केले होते तरीही परिषदेत खालीलप्रमाणे निर्णय घेतले.

1) ब्रिटिश इंडिया आणि संस्थानिकांचे एक संघराज्य असावे मात्र संस्थानिकांचे अंतर्गत स्वातंत्र्य कायम रहावे अशी बिकानेर व भोपाळ संस्थानच्या प्रतिनिधींची अट मान्य झाली मुस्लीम लिगने या निर्णयाला संमती दिली.

२) संघराज्य कार्यकारी मंडळ कायदेमंडळाला काही प्रमाणात जबाबदार असेल अर्थात सरकार बरेच खास अधिकार आपल्या हाती ठेवणार होता. सायमन कमिशनने तशी शिफारस केली होती.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

3) द्विदल राज्यपद्धती स्थापना करून प्रांतिक स्वायत्ता निर्माण केली जाईल 1919 च्या सुधारणा हिंदुस्थानाला या निर्णयानुसार मिळणार होत्या.

4) जातीय प्रश्नावर एकमत झाले नाही मुसलमानांचा स्वातंत्र मतदारसंघाचा आग्रह कायम होता डॉ आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी आना राखीव जागाची मागणी केली हिंदु प्रतिनिधी चा स्वातंत्र मतदारसंघास विरोध होता याप्रमाणे निर्णय झाले तरी काँग्रेसच्या सहकार्यासिवाय त्या निर्णयांना अर्थ नव्हता आणि अंमलबजावणी शक्य नव्हती तेव्हा काँग्रेसने परिषदेत सहभागी व्हावे यासाठी इंग्रज सरकारने प्रयत्न केले आणि त्यातुन गांधी आयर्विन करार झाला.

## गांधी आयर्विन करार (5 मार्च 1931) :-

सरकारने काँग्रेसबरोबर बोलणी व्हावीत म्हणुन महात्मा गांधी व इतर काँग्रेसने नेत्यांची तुरुंगात मुक्तता केली. जयकर सप्रू इत्यादी नेत्यांनी गांधीजींना भेटून व्हाईसरॉयची भेट घेऊन चर्चा करावी असे सुचवले त्यानुसार गांधीजी यांची फेब्रुवारी 1934 मध्ये चर्चा झाली दोघानी समजुतदारपणा दाखवला आणि तो करार केला तोच गांधी आयर्विन करार होय त्या कराराची महत्वाची कलमे खालीलप्रमाणे

1) राजकीय कैद्यांची सुटका व्हावी त्यांच्यावरील खटले मागे घ्यावेत तसेच वटहूकूमही रद्द करावे

2) मिठावरील कर काही प्रमाणात रद्द व्हावा मीठ तयार करण्यास गरिबांना परवानगी असावी

3) परदेशी माल आणि दारु दुकानावर शांततामय निदर्शनाचा हक्क असावा

4) कायदेभंग चळवळीत जप्त केलेली मालमत्ता ज्याची त्यांना परत करावी

5) कायदेभंग चळवळ स्थगित करावी

6) बहिष्कार चळवळ मागे घ्यावी

7) काँग्रेसने गोलमेज परिषदेत भाग घ्यावा

8) संरक्षण परराष्ट्र आत्पसंख्याक अशा काही खाती मेल्या राज्य-

Scanned by CamScanner

कारभार पद्धती राखीव असावीत
अशा प्रकारे हा करार झाला त्यानुसार 1930 साली सुरु केलेली सविनय कायदेभंग चळवळ गांधीजींनी काही काळ स्थगीत केली.

- दुसरी गोलमेज परिषद :- (1931)

वरीलप्रमाणे करार झाला पण तो अंमलात येण्यापुर्वीच लॉर्ड आयर्विनच्या जागी लॉर्ड विलिंग्डन व्हाईसरॉय झाले ते प्रतिगामी धोरण असून स्वातंत्र्य चळवळ दडपून टाकण्याचे प्रयत्न सुरु केले पण त्यांच्याकडून अनुकूल प्रतिसाद मिळाल्यानंतर महात्मा गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेला ऑगस्ट 1931 मध्ये हजर राहिले दरम्यान इंग्लंडमध्ये निवडणुका होऊन हुजूर पक्ष सत्तेवर आला त्या सरकारचा हिंदुस्थानाकडे बघण्याचा दृष्टीकोण ताठर बनला

हिंदुस्थानात भावी राज्यघटना कशी असावी यावर परिषदेत चर्चा आणि निर्णय अपेक्षीत होते पण तो प्रश्न गौण ठरवुन खरी चर्चा झाली ती जातीय प्रश्नावर मुस्लीम अस्पृश्य ख्रिश्चन अँग्लो इंडियन लोकांच्या प्रतिनिधींनी स्वातंत्र मतदार संघाची मागणी केली ते गांधीजींना आपले प्रतिनिधी मानत नव्हते तेंव्हा संपूर्ण स्वातंत्र्याची त्यांनी मागणी केली सरकार त्यास तयार नव्हते अर्धवट स्वरुपाची जबाबदारी शासनपद्धती केंद्रात आणण्यास सरकार तयार होते.

- कायदेभंग चळवळीचे दुसरे पर्व (1932-34)

1931 च्या अखेरीस महात्मा गांधी विलायतहून परतले मुंबईत त्यांचे स्वागत झाले पण एकुन परिस्थिती पाहून लोकांना त्यांनी सावध केले तसेच भावी लढ्याचे मनात नियोजन केले व्हाईसरॉयनी विचारविनिमयाला नकार देऊन दडपशाही सुरु केली त्यासाठी वटहूकूम काढू लागले गांधी आयर्विन करार संपुष्टात आणला तेंव्हा सविनय

कायदेभंग चळवळ तीव्र करण्याशिवाय गांधीजींपुढे पर्याय नव्हता तेव्हा जानेवारी १९३२ मध्ये गांधीजींनी जनतेला आह्वान केले तत्पूर्वी सरकारने पंडीत नेहरु सरहद्द गांधी इत्यादी नेत्यांना कैद केले होते गांधीजींनी जनतेला आवाहन करताना दुसरे दिवशी ५ जानेवारी १९३२ रोजी सरकारने गांधीजी सरदार पटेल व इतर अनेक नेत्यांनी अटक केली त्यापुढे जाऊन काँग्रेस ही संघटना बेकायदेशिर ठरवली व्हाइसरॉयने दडपशाहीचा कहर केला कडक वटहुकूम काढले एक लाख विस हजार लोकांना कैद केले १८५७ नंतर प्रथमच १९३२ साली अत्याचार व दडपशाही राबवली.

- **रॅम्से मॅकडोनाल्डचा जातीय निवाडा व पुणे करार :-**

दुसऱ्या गोलमेज परिषदेतील निर्णयप्रमाणे ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी 16 ऑगस्ट 1932 रोजी आपला निर्णय घोषित केला तो निर्णय जातीय निवाडा ओळखला जातो.

या निवाड्यानुसार अल्पसंख्य मुस्लीमांना प्रमाणपेक्षा अधिक प्रतिनिधीत्व दिले पण जेथे हिंदी अल्पसंख्य होते तेथे मात्र तसा न्याय दिला नाही ख्रिश्चन अँग्लो इंडियन यांनाही पक्षपाती फायदा दिली शिवाय अस्पृश्यांना हिंदु समाजापासुन वेगळे करण्याचा निर्णय घेतला गांधीजींना याचे फार दुःख झाले अस्पृश्यांना स्वातंत्र मतदारसंघ तर मिळालाच शिवाय सर्वसामान्य मतसंघात मतदानाचा हक्कही मिळाला.

हिंदु समाजात फुट पाडून अस्पृश्यता वेगळे करण्याचे फोडा व राज्य करा हा कुटिल हेतु गांधीजींना ओळखला भविष्यातील राष्ट्राला त्याचा धोका ओळखला आणि त्या जातीय निवाड्याविरुद्ध प्राणांतिक उपोषण करण्याचा निर्णय घोषित केला. त्याप्रमाणे त्यांनी उपोषण सुरु केले देशभर अवस्थता निर्माण झाली. प्रमुख नेतेमंडळांनी धावपळ झाली.

GoodLuck Page No.
Date

## तिसरी गोलमेज परिषद (१९३२)

नोव्हेंबर डिसेंबर 1932 मध्ये ही परिषद भरविण्यात आली अर्थात या परिषदेत साम्राज्यवादी ब्रिटीश सरकारला फारसा रस नव्हता कारण त्यांना हिंदुस्थानला भरीव राजकीय सुधारणा देण्याची इच्छा नव्हती सरकारशी पूर्णतः एकनिष्ठ असणाऱ्या 46 लोकांना परिषदेला बोलाविले होते. काँग्रेसने परिषदेला बोलाविले होते. काँग्रेसने परिषदेत भाग घेतला नाही इंग्लंडमधील मजूर पक्षही सहभागी नव्हता अशा परिस्थीती ही परिषद केवळ औपचारिकता ठरली. दुसऱ्या गोलमेज परिषदेने स्थापन केलेल्या समित्यांच्या अहवालावर चर्चा झाली ठाम निर्णय झाले नाहीत एकुण तीन गोलमेज परिषदांच्या अहवालावर आधारित एक श्वेतपत्रिका ब्रिटीश सरकारने प्रसिद्ध केली. ती प्रतिगामी स्वरुपाची होती. त्यामुळे तिच्यावर सर्वत्र कठोर टिका झाली.

गांधीजींनी पुणे करार केला इंग्रजांची कुटील नीती त्यांनी ओळखली. त्यांनी सविनय कायदेभंग चळवळी कडे दुर्लक्ष करुन सामाजिक कार्यावर लक्ष केंद्रीत केले अस्पृश्यता निवारण्याच्या कामाला त्यांनी प्राधान्य दिले त्यासाठी त्यांनी हरिजन सेवक संघ स्थापन केला.

## C) चलेजाव चळवळ :-

आपण आतापर्यंत असहकार चळवळ 1923 ते 1926 या काळातील स्वराज्य पक्षाची चळवळ १९२७ ते १९२८ मधील सायमन विरुद्ध चळवळ आणि १९३० ते १९३४ मधील सविनय कायदेभंग चळवळ अशा महत्वपूर्ण राष्ट्रीय आंदोलनांचा अभ्यास केला त्याचबरोबर नेहरु रिपोर्ट गोलमेज परिषदा याही घटनांची दखल घेतली. या सर्व घटनांपासून १९३५ च्या कायद्याची पार्श्वभूमीवर तयार झाली त्याच अभ्यास पुढे आपण स्वतंत्र प्रकारामध्ये करणार आहोत चळवळी अंतर्गत गांधी युगातील ~~शेवटचे~~ शेवटचे राष्ट्रव्यापी आंदोलन म्हणजे चलेजाव चळवळ येथे आपण पाहणार आहोत 1942 च्या चलेजाव चळवळी दरम्यान

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

भारताबरोबर जागतिक राजकरण अस्थिरतेचे होते १९३९ साली दुसऱ्या महायुद्धास सुरवात झालेली होती तेव्हा चळवळीपूर्वी ती राजकीय परिस्थीती व त्यातुन घडलेल्या काही घटनांचा आढावा घेणे आवश्यक आहे

## दुसरे महायुद्ध आणि स्वातंत्र्य चळवळ :-

१९३५ च्या कायद्यानुसार प्रांतात स्वायत्ता निर्माण होणार होती त्यासाठी १९३७ साली प्रांतिय कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या काँग्रेसला हा कायदा मान्य नव्हता तरीही कायदेमंडळात सरकारशी असहकार करण्यासाठी या निवडणुका लढविल्या आठ प्रांतात काँग्रेसची सरकारे सत्तेवर आली पण १९३९ साली युरोपात दुसरे महायुद्धात सुरु झाले व्हाइसरॉयने हिंदुस्थानात इंग्लंडच्या बाजूने या युद्धात उतरल्याचे परस्पर घोषित केले त्याचबरोबर हिंदुस्थानातील स्वातंत्र चळवळीचे स्वरुप बदलत येऊन स्वातंत्र्य चळवळीचे शेवटचे पर्व सुरु झाले यातुन गांधी युगातील चलेजाव चळवळीस सुरवात झाली.

जर्मनचा हुकूमशहा हिटलरने पोलंडवर आक्रमण करताच ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले त्या वेळी लॉर्ड लिनलिथगो हे हिंदुस्थानाचे इंग्रजी व्हाईसराय होते त्यांनी त्याच दिवशी घोषित केले की हिंदुस्थानात इंग्लंडच्या बाजुने युद्धात सहभागी झाले आहे म्हणजे हिंदुस्थानाविरुद्ध जर्मनी युद्ध सुरु झाले होते पण व्हाइसरॉयनी कोणाही हिंदी नेत्याशी विचारविनीमय न करता त्यांना विश्वासघात न घेता परस्पर घोषणा केली होती त्यापुढे जाउन ब्रिटिश पार्लमेंटने १९३५ च्या कायद्यात दुरुस्ती करुन आता हिंदुस्थानाची सर्व प्रांतिय आणि केंद्रीय सत्ता व्हाईसरॉयच्या हाती सोपवली युद्धजन्य परिस्थीती हाताळण्यासाठी त्याची आवश्यकता सांगण्यात आली त्यामुळे प्रांतिय स्वयत्तता संपूर्णात संपुष्टात आली यावर प्रतिक्रिया म्हणून सर्व प्रांतातील काँग्रेस मंत्रीमंडळानी राजीनामे दिले पंजाब, बंगाल व सिंधु येथे काँग्रेसची मंत्रीमंडळे नव्हती या मंत्रीमंडळानी

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

सरकारला पाठिंबा दिला काँग्रेसने इंग्रज सरकारच्या धोरणावर कडक टिका केली साम्राज्यवाद्यांचे युद्ध हे साम्राज्यवादासाठीचे असणार अशा युद्धात गुलामगिरीत असलेल्या हिंदुस्थानाने सहभागी होऊ नये लोकशाही व स्वातंत्र्यासाठी इंग्लंड युद्ध करीत असेल तर प्रथम इंग्लंडने हिंदुस्थानाला स्वातंत्र्य द्यावे मग आम्ही इंग्लंडच्या युद्ध प्रयत्नांत सामील होऊ पारतंत्र्यात असताना आम्ही इंग्लंडच्यावतीने लढणार नाही असे काँग्रेसने सरकारने ठामपणे कळविले सरकारने कुटील नीती अवलंबुन काँग्रेसला अंतरावर ठेवुन मुस्लीम लीगबद्दल अनुकूल धोरण स्वीकारले.

## • ऑगस्ट घोषणा :-

महायुद्धाने युरोपात गंभीर रुप धारण केले प्रत्यक्ष इंग्लंडचे देश संकटात सापडला होता त्यामुळे हिंदुस्थानाची मदत आणि काँग्रेसची आनुकूलता ब्रिटिश सरकारला आवश्यक वाटू लागली त्या दृष्टीने 8 ऑगस्ट 1940 रोजी व्हाईसरॉयनी एक घोषणा केली तिला ऑगस्ट घोषणा असे म्हणतात त्यातील महत्त्वाची आश्वासने खालीलप्रमाणे

1) हिंदुस्थानाला वसाहतीचे स्वराज्य देणे इंग्लंडचे धोरण असेल
2) युद्ध समाप्तीनंतर हिंदुस्थानाची घटना तयार करण्यासाठी हिंदी प्रतिनिधींचीच एक परिषद बोलवली जाईल अल्पसंख्यांकांच्या हिताचे रक्षण करणारी घटना असेल.
3) गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलमध्ये हिंदी नेत्यांचा समावेश केला जाईल परंतु हा प्रस्ताव काँग्रेस व मुस्लीम लीग दोन्ही पक्षांनी नाकारला

## • वैयक्तिक सत्याग्रह (१९४० ते १९४२) :-

इंग्लंड महायुद्धाच्या गंभीर संकटात सापडले होते पण इंग्लंडला धोका निर्माण होऊ नये त्याच्या समस्या आणखी वाढू नयेत असे गांधीजींना प्रामाणिकपणे वाटत होते पण अशा परिस्थितीतही इंग्लंड हिंदुस्थानाला पूर्ण स्वातंत्र्याची हमी द्यायला तयार नव्हते त्यामुळे काँग्रेसने नाईलाजाने

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

असहकार पुकारला व्हाईसरॉयने घोषणा केल्यानंतर लगेच ऑगस्ट १९४० काँग्रेसचे मुंबईला अधिवेशन झाले सरकारशी असहकार म्हणुन गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह करण्याचा प्रस्ताव अधिवेशनात मंजूर करुन घेतला.

वैयक्तिक सत्याग्रह म्हणजे गांधीजींनी सांगतील त्या स्वयंसेवकांनी एकट्यानेच सरकारचा कायदा मोडवा आणि त्याबद्दल सरकारने देईल ती शिक्षा स्वीकारावी असा अर्थ होता 17 ऑक्टोबर १९४० रोजी गांधीजीच्या आदेशावर विनोबा भावे यांनी सर्वप्रथम भाषबंदी कायदा मोडला त्यांना सहा महिन्याची शिक्षा झाली पंडीत नेहरुंनी सहा वर्षाची शिक्षा झाली अशा रितीने संपूर्ण देशभर वैयक्तिक सत्याग्रह झाल्याने १९४२ पर्यंत देशभर सुमारे 25 हजार स्वयंमसेवकांनी तुरुंगात टाकले पण त्यामुळे इंग्लडसमोरचा धोका टळणार नव्हता उलट युद्धप्रयत्नात त्यांना अडथळे येत होते जपान अधिक आक्रमक बनला होता सिंगापुर, मलया, इंडोनेशिया इत्यादी काबीज करुन जपान हिंदुस्थानाच्या सीमेपर्यंत आला इंग्लडला हिंदुस्थानाचे रक्षण करणे सोपे नव्हते इंग्लडचे पंतप्रधान चर्चिलने तसे कबुल केले की काँग्रेस देखिल जपानचा धोका दिसु लागला तेंव्हा काँग्रेसने आपली सत्याग्रहाची चळवळ थांबविली हिंदुस्थानाचा प्रश्न सोडवावा असे आंतराष्ट्रीय दडपण इंग्लडवर वाढू लागले. तेंव्हा या एकुण परिस्थीतीचा विचार करुन हिंदुस्थानातील राजकीय पेचप्रसंग सोडवण्यासाठी सर स्टफर्ड क्रिप्स या इंग्लडच्या मंत्र्याला मार्च १९४२ मध्ये भारतात पाठविले

- **क्रिप्स योजना :-**

काँग्रेसने पुकारलेला असहकार आणि सत्याग्रह दुसऱ्या महायुद्धामुळे इंग्लडसमोर उभे राहिले भीषण संकट अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्ट चीनचे सरसेनापती चँग कै शेक व ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रमंत्री इव्हेट यांनी हिंदुस्थानासाठी निर्माण झालेला धोका इत्यादी कारणामुळे विलायत सरकारने क्रिप्स मिशन हिंदुस्थानात पाठवले आठवडाभरातच ३ मार्चला क्रिप्सने आपली योजना जाहिर केली.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

1) भारतात लवकरच वसाहतींच्या दर्जाचे पूर्ण स्वातंत्र्य दिले जाईल.
2) भारतात ~~लवकरच वसाहतींच्या~~ एक हिंदी संघ (इंडियन युनियन) स्थापन व्हावा त्याला मर्जीप्रमाणे ब्रिटिश राष्ट्रकुलातून बाहेरही पडता येईल.
3) महायुद्ध संपताच घटना समितीची निर्मिती करण्यात येईल
4) प्रांतिय कायदेमंडळातून घटना समितीचे सदस्य निवडले जातील त्यांची निवड प्रमाणशीर प्रतिनिधीत्व या तत्वानुसार होईल.
5) घटना समितीत संस्थानिकांनी आपले प्रतिनिधीत्व पाठवु शकतील
6) पण ज्या प्रांताना किंवा संस्थानिकांना ही घटना मंजुर नसेल त्यांना स्वतंत्र घटना निर्माण करता येईल त्यांना इंडियन युनियनचा दर्जा असेल आणि ते विलायत सरकारशी स्वतंत्र संबंध ठेवु शकतील.
7) अल्पसंख्याकांच्या हक्क रक्षणासाठी ब्रिटिश सरकार घटना समितीशी करार करील
8) महायुद्धात चालु असेल पर्यंत भारताच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लडची असेल.

महायुद्ध चालु असेपर्यंत भारताच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लडची असेल क्रिप्स योजनेमुळे भारतीयांचे आजिबात समाधान झाले नाही राष्ट्रसभा मुस्लीम लिग संस्थानिक अशा सर्व घटकांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. या प्रस्तावाने प्रांत आणि संस्थानिकांना दिलेल्या स्वयंनिर्णयाच्या हक्काने हिंदुस्थानात अनेक राज्य निर्माण करण्याचा कुटिल डाव इंग्रज सरकारने टाकला होता. हिंदुस्थानाचे राष्ट्रीय ऐक्य नष्ट करुन त्यांना आपेक्षीत नवीन राज्ये ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या वर्चस्वाखाली आणाची काही दृष्ट ठेवणे असा इंग्रजांचा स्वार्थ होता. त्यामुळे राष्ट्रसभेने या सभेला ठाम विरोध केला शिवाय घटना समितीचे प्रतिनिधी संस्थानिक नेमणार होते. ते लोकनियुक्त होते. नव्हते युद्धकाळात संरक्षण खाते हिंदी मंत्र्याच्या हाती असणे आवश्यक होते.

Scanned by CamScanner

अशा कारणांमुळे काँग्रेसने ही योजना फेटाळली. अभ्यासाच्या सोईसाठी या चळवळीची कारणे खालीलप्रमाणे थोडक्यात देता येईल.

1) क्रिप्सचे अपयश :-

भारतीयांच्या मागण्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी ब्रिटिश सरकारने क्रिप्स मिशन पाठवले पण त्याला समाधानकारक अहवाल करता आल नाही क्रिप्सने याबद्दल हिंदी राष्ट्रसभेला जबाबदार धरले त्यामुळे राष्ट्रसभेचे नेते संतप्त झाले चळवळीशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही याची खात्री पटली.

2) साम्राज्यवाद्यांचे धोरण :-

भारताला स्वातंत्र्य द्यायचे आहे त्यासाठी क्रिप्स मिशन पाठवले पण त्याला राष्ट्रसभेने साथ दिली नाही असा साम्राज्यवादी ब्रिटिश सरकार प्रचार करु लागले त्याहीपुढे जाऊन राष्ट्रसभा ही सर्व हिंदुस्थानाची प्रतिनिधी नव्हे तेव्हा कोणाकडे सत्ता सोपवायची असा प्रश्न पडला आहे असे समर्थन करुन जगातील लोकशाहीप्रधान देशाची सहानुभूती मिळवण्याचे साम्राज्यवादी धोरण ब्रिटिश सरकारने स्वीकारले

3) सरकारची दडपशाही :-

युद्धजन्य परिस्थितीमुळे जनता महागाईच्या संकटात सापडली होती त्यांना मदतीची गरज होती. उलट सरकारने अतिरेकी दडपशाहीचे धोरण स्विकारले होते उदा. बंगालमधील हजारो एकर जमीन लष्करी तळासाठी शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने बळकावली होती त्यामुळे लोकांपुढे उपासमारीचे संकट उभे होते

4) जपानचे आक्रमण :-

दुसऱ्या महायुद्धात जपानने आक्रमक धोरण स्वीकारले आग्नेय आशियातील सिंगापुर मलेशिया ब्रम्हदेशाची राजधानी रंगुन ~~महात्मा~~ गांधींनी अल्पकाळात काबीज केले इंग्रजांना हकलून दिले. हिंदुस्थानाच्या सीमेवर जपान धडकला महात्मा गांधींनी

ओळखले की जपानपासुन इंग्लंड हिंदुस्थानाचे रक्षण करु शकणार नाही अर्थात हिंदुस्थानावर इंग्रजांची सत्ता आहे म्हणुनच केवळ जपानी आक्रमणाचा धोका होता.

5) महात्मा गांधीजीचे वास्तव धोरण :-
महात्मा गांधीची अहिंसा तत्वावर श्रद्धा होती त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीचे ते मुख्य साधन होते त्यामुळेच 1920 साली सुरु केलेली असहकार चळवळ चौरीचौरा येथील एका हिंसात्मक घटनेमुळे त्यांनी 1912 साली थांबवली होती देशभर पसरलेली ती चळवळ आचानक तहकुब केल्याने अनेक नेते लोक निराश झाले होते एवढ्या विशाल देशात एखाद्या ठिकाणी हिंसा घडली म्हणुन हा निर्णय योग्य नाही असे त्यांना वाटले. या गोष्टीचा राष्ट्रीय चळवळीवर प्रतिकुल परिणाम झाला.

• चळवळीची वाटचाल :-

1) राष्ट्रसभेच्या नेत्यांना कैद :-
इंग्रज सरकारच्या संभाव्य धोरणाबाबतचा महात्मा गांधीजींचा अंदाज चुकला 8 ऑगस्ट 1942 रोजी चले जाव चळवळ पुकारली पण सरकारने त्याच रात्री राष्ट्रसभेच्या सर्व प्रमुख नेत्यांना कैद करुन दडपशाहीचे धोरण राबवण्यास सुरवात केली महायुद्धाच्या संकटामुळे सरकार असे धोरण स्वीकारणार नाही असे महात्मा गांधीना वाटत होते पण त्यांचा अंदाज चुकला महात्मा गांधी, नेहरु मौलाना आझाद, आचार्य कृपलानी, सरदार पटेल अरुणा असफअली गोविंद वल्लभपंत इत्यादि नेत्यांना 8 ऑगस्ट 1942 च्या रात्रीच अटक केली.

2) इतर राजकिय पक्षाची भुमिका :-
चले जाव चळवळीच्या वाटचालीवर भारतातील इतर राजकिय पक्षांच्या धोरणाचा परिणाम होणे सहाजीकच होते मुस्लीम लीगने सरकारबरोबर हातमिळवणी केली राष्ट्रसभेने

Scanned by CamScanner

पुकारलेली ही चळवळ म्हणजे देशाची सत्ता हिंदुंच्या हाती देण्याचा चालवलेला प्रयत्न होय असा लीगने आरोप केला आणि आणि चळवळीविरुद्ध सरकारला सहकार्य केले हिंदु महासभा चळवळीबाबत सक्रिय व उदासिन राहिली कम्युनिस्ट पक्षाने सरकारचे अनुकूल धोरण स्वीकारले.

3) जनतेने चालवलेली चळवळ :-

8 ऑगस्ट 1942 रोजी राष्ट्रसभेने चळवळीचा ठराव पास केला पण ती लगेच सुरु होणार नव्हती तिचा कार्यक्रम पद्धती गांधीजी जाहिर करणार होते. सरकारशी पत्रव्यवहार करणार होते त्यात किमान दोन आठवड्यांचा अवधी जाणार होता पण सरकारने त्याच रात्री सर्व नेत्यांना कैद केले त्यामुळे जनता नेतृत्वहीन बनली चळवळ कशी राबवावी हे त्यांना कळेना तेंव्हा जनता जमेल तशी चळवळ राबवु लागली करा किंवा मरा एवढाच मंत्र त्यांना कळला होता. पण मरेपर्यंत संघर्ष कसा करावा हे कळेना पण नेतृत्व नाही म्हणुन जनता स्वस्थ बसली नाही.

4) सरकारची दडपशाही :-

ही चळवळ दडपुन टाकण्यासाठी सरकारने क्रुरपणे सर्व मार्ग आवलंबिले शांतपणे चाललेल्या सभांवरही गोळीबार केला विमानातुन मशिनगन्स चालवुन जमाव पांगवले. निशःस्त्र लोकांवर स्त्रियांवर अन्याय अत्याचार केले कैद्यांना उपाशी ठेवुन छळवाद केला पोलिस गोळीबारात 1028 लोक मारले गेले 3200 जखमी झाले अशी सरकारी आकडेवारी आहे पंडीत नेहरुंच्या मते चळवळीत मारले गेल्यांची व जखमींची संख्या 10,000 असावी सरकारी आकडेवारीनुसार 60 हजार लोकांना कारावास झाला होता पटणा नाडिया बंगलोर इत्यादी सहा ठिकाणी जमाव पांगवण्यास बॉम्बहल्ले केले तर 60 ठिकाणी लष्कर बोलावले गेले. जनतेने 318 रेल्वे स्टेशने जाळली 12 हजार ठिकाणी टेलिफोन तारा तोडल्या 60 पोस्ट ऑफीस नष्ट केली शेकडो पोस्ट ऑफिसवर हल्ले केले.

Date

5) महात्मा गांधींचे २१ दिवसांचे उपोषण :-

८ ऑगस्ट १९४२ रोजी राष्ट्रसभेने चळवळीचा ठराव पास केला पण ती लगेच सुरु होणार नाही तिचा कार्यक्रम पद्धती गांधीजी जाहिर करणार होते. पण सरकारने त्याच रात्री सर्व नेत्यांना कैद केले त्यामुळे जनता नेतृत्वाखाली महात्मा गांधींसह प्रमुख नेते दिर्घकाळ तुरुंगात होते तरी लोकांनी चळवळ वरीलप्रमाणे चालु ठेवली होती दरम्यान १९४३ च्या प्रारंभी सरकारने दंगलीतील राष्ट्रसभेची जबाबदारी या नावाची पुस्तिका प्रसिद्ध करुन १९४२ च्या आंदोलनातील हिंसक घटनेस गांधीजी व काँग्रेस नेते यांना जबाबदार धरुन केवळ ओठावर अंहिसावाद व कृतित हिंसावाद असा आरोप केला युरोप अमेरिकेतील जनतेची दिशाभुल करणे हा उद्देश होता आंदोलनात हिंसक घटना घडल्या होत्या पण कैदेतील गांधीजी त्याला जबाबदार कसे? असा प्रश्न पडतो ज्यांना अंहिसा कळली नाही किंवा मान्य केली नाही. अशा लोकांना किंवा सशस्त्र क्रांतीकारकांनी या घटना घडविल्या असतील शांततामय मार्गावर बंदी घालणारे सरकारच याला जबाबदार होते. त्यासाठी सरकारने गांधीवर अनीतिमत्ता गुप्तता, असत्यता, जपाणधार्जिणे हिंसेत चिथावणी इत्यादी गंभीर आरोप केले गांधीजींना फार दु:ख झाले याविरुद्ध त्यांनी १० फेब्रुवारीला १९४३ पासुन २१ दिवसांचे उपोषण सुरु केले.

चले जाव आंदोलनाचे महत्व :-

आधुनिक भारताच्या इतिहासात चले जाव चलेजाव चळवळीला फार मोठे महत्व आहे जयप्रकाश नारायण म्हणतात फ्रान्समध्ये जसे १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे रशियात जसे १९१७ च्या राज्यक्रांतीचे महत्व आहे तसे १९४२ च्या क्रांतीचे हिंदुस्थानाच्या इतिहासात स्थान आहे जगातील कोणत्याही क्रांतीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनतेने भाग घेतला नाही ही चळवळ पूर्णत: यशस्वी झाली नाही. तरी तिचे महत्व कमी होत नाही ब्रिटिश साम्राज्याची बलाढ्य सत्ता हे

Scanned by CamScanner

अपयशाचे एक कारण होय डॉ अंबा प्रसाद यांच्या मते अपयशाचे कारण म्हणजे सरकारच्या नोकरीत असणाऱ्या हिंदी नोकरांनी सरकारने फार मोठी मदत केली. हिंदी नोकरांनी जर असहकार पुकारला असता तर ब्रिटिशांना येथे राज्य करणे शक्य झाले नसते.

अर्थात अपयशाची अशी कारणे दिली जात असली तरी ही चळवळ म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनातील फार महत्वाचा टप्पा मानला जातो चळवळीनंतर केवळ चार ते पाच वर्षात देशाला स्वातंत्र मिळाले चळवळीने त्याची पार्श्वभुमी किंवा अनुकूलता तयार केली या आंदोलनात हजारो लोक तुरुंगात गेले लाठीमार तुरुंगवास गोळीबार याची समाजातील भीती निघून झाली लष्करातील हिंदी सैनिकात आता राष्ट्रीयचळवळीबद्दल आपलेपणा निर्माण झाला अशा परिस्थितीत या देशावर फार काळ राज्य करता येणार नाही याची सरकारला जाणीव झाली. हिंदुस्थानाबाहेरील हिंदी लोकांना यातुन प्रेरणा व स्फुर्ती मिळाली या चळवळीचा आणखी एक परिणाम म्हणजे इंग्रज व मुस्लीम लीग यांची युती अधिक घनिष्ठ झाली त्याचे परिणाम देशाच्या फाळणीत झाले तुरुंगात असलेले महात्मा गांधीजी एप्रिल १९४४ मध्ये फार आजारी पडले ते आता फार दिवस जगु शकणार नाही तेव्हा त्यांच्या मृत्युचा आक्षेप नको म्हणुन व्हाइसरॉय वेव्हेल यांनी ६ मे १९४४ रोजी त्यांना कैदेतुन मुक्त केले.

अशा रितीने आपण आतापर्यंत महात्मागांधीच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या असहकार सविनय कायदेभंग आणि चले जाव या चळवळीचा सविस्तर अभ्यास केला. १९४७ अखेर महात्मा गांधीचा भारतीय राजकारण व समाजकारण पूर्ण प्रभाव व वर्चस्व होते चले जाव चळवळीनंतर घडलेल्या अनेक घडामोडी सदर ग्रंथामध्ये अन्यत्र योग्य ठिकाणी घेतलेल्या आहेत परंतु अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट तिन्ही चळवळी आपण पूर्ण केल्या आहेत त्यातील महात्मा गांधीजींचे कार्य व नेतृत्वाचे महत्व अनेकांनी व्यक्त केले आहेत त्यातील महात्मा गांधीजींचे कार्य व महत्व अनेकांनी व्यक्त केले आहे.

Scanned by CamScanner